भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०५/२०१७

**१) रेल्वे लाईन वरील विद्युत कॉपरच्या ताराची चोरी. :-**

दिनांक ०९/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने बेला शिवारात ऑर्डन्स फॅक्टरीत जाण्याचे रोडचे रेल्वेलाईन वरील विद्युत कॉपरचे तार १३ किलो किंमती २,०००/-रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी समीरकुमार विजय मोदक वय ५८ वर्ष, रा. वरीष्ठ अनुभाग अभियंता उपरी उपसकर डिपो तुमसर रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन मालमत्तेचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०९/०५/२०१७ चे १४.२४ ते १६.४२ वा. दरम्यान यातील महिला हीचे पतीने मारहान करुन घराबाहेर काढल्याबाबत तक्रार देण्यात आली असता तिच्या तक्रारी वरुन कर्तव्यावर असलेले फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह पोलीस वाहनाचे तक्रारदार हीचे पती आरोपीस समजवीण्यास गेले असतांना त्यांने त्यांना शिवीगाळ करुन त्यांचे वर हात उगारुन ते करीत असलेले शासकीय कर्तव्यास व्यत्यय आणल्याने व शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि मरकटे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. गोबरवाही येथे कलम ३५३,१८६,१८७,५०४ भांदवि. सहकलम ३ सार्वजनीक संपत्ती व प्रतीबंधक अधीनीयम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) रात्रीचे वेळी अंधारात दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०८/०५/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान यातील आरोपी हे रात्रीचे वेळी अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने लपत छपत फिरत असतांनी संशयीत रित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. तलमले यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) पेटती काडी साडीला लागुन जळाल्याने महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु. :-**

दिनांक ०८/०५/२०१७ चे १६.३० वा दरम्यान यातील मृतक सौ. नमीता प्रल्हाद शेंडे वय ३५ वर्ष, रा. धामनी ही दि. ३०/०४/२०१७ ला घरी चहा बनवीत असतांनी चुलीची पेटती काडी तीच्या साडीला लागुन तीचे कंबरे पर्यतचा भाग जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता ती दि. ०८/०५/२०१७ ला उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाव्दारे पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चुटे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

६) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक ०९/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. तुमसर, पवनी, लाखांदुर व जवाहरनगर येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १८५ लिटर हातभट्टी दारु+ २८६५ किलो सडवा मोहा +१ मोटार सायकल किमंती १,३८,६५०/—रु. ७५६ लीटर ३६० मिली लिटर देशी दारू + १ स्कॉर्पीओ + १ मारोती आटो किंमती ८,१३,८६०/रु. असा एकुण किंमती ९,५२,५१०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०९/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ८८०५६५७२६७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.